# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in व

परिपत्रक क्र.०१/२०२६
प्रस्ताव शाखा

जा.क्र.झोपुप्रा/प्रस्ताव/११६-४/२०२६
दि.१४/०१/२०२६

विषय : अघोषित झोपडयासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी सद्दष्य अहवाल तयार करणेस समिती स्थापन करणेबाबत.

संदर्भ : १. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे चे परिपत्रक क्र. १८० दि.०१.०६.२०१६.
२. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे चे परिपत्रक क्र. २१५/२०१७ दि.०१.०७.२०१७.
३. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे चे परिपत्रक क्र.०४/२०२५ दि.०१.०७.२०२५.

झोपडपट्टी पुनर्वसन (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ४ नुसार महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी घोषित न झालेल्या झोपडपट्टयांवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवण्यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संदर्भिय क्र.१, २ व ३ वरील परिपत्रकानुसार मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. सदर अधिनियमाप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यकक्षेतील ज्या अघोषित जागांवर झोपडपट्टी सद्दष्य परिस्थिती आहे तथापी अद्यापर्यत सदर जागा झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेली नाहीत अशा जागांची पहाणी करून ती जागा झोपडपट्टी क्षेत्र घोषित करावी किंवा नाही हे निश्चित करणेस खालील समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.न. | समितीचे पद | पद |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | सचिव,<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे |
| २ | सदस्य | संबधित सक्षम विभागाचे सक्षम प्राधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी,<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे |
| ३ | सदस्य | उपअधिक्षक भूमि अभिलेख,<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे |
| ४ | सदस्य<br>सचिव | तहसिलदार प्रस्ताव,<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे |

संदर्भ १ मध्ये नमुद परिपत्रकामधील नमुन्यात स्थळपहाणी अहवाल सादर करतांना त्यासोबत झोपडपट्टी क्षेत्राची गुगल छायाचित्र व Real time छायाचित्र व व्हिडीओ काढावे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी क्षेत्रावर पुनर्वसन योजना राबविण्यात येणार आहे अशा क्षेत्राबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे स्तरावर झोपडपट्टी पुनर्वसन (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३क अंतर्गत "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्यास उपरोक्त समितीने सदरची जागा पाहणी केलेनंतर अधिनियमाप्रमाणे घोषित नसलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी सदृष्य आहे किंवा नाही याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे, यांना सादर करावा.

14/1/2026

सतीशकुमार खडके (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी-चिंचवड, पुणे.

प्रत :- १) सर्व विभाग प्रमुख, झोपुप्रा, पुणे.
२) सर्व विकसक (झो.पु. नोंदणीकृत)